## <u>नि.दि.मु.क्र.०९/२००९ मधील निशाणी क्र.१८० वरील आदेश</u>
## <u>(**CNR No. MHSI**080000972009)</u>

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०९ चे वारस दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की,वादीने प्रस्तूत दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादी यांनी नि.क्र.१६३ ते १६५ वर म्हणणे दिले आहे. सदर प्रतिवादी यांनी त्यांचे नि.क्र.१६३ ते १६५ वरील म्हणणे मध्ये दाव्याचे कामी आवश्यक त्या वारसांना सामील करुन घेतले नसल्याची हरकत घेतली आहे.सबब, दाव्याचे कामी कोणतीही तांत्रीक उणीव राहू नये याकरीता दुरुस्ती करुन घेणे गरजेचे बनले आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.९–४ राजश्री सदानंद धामापुरकर लग्नानंतरची राजश्री रितेश देवलेकर यांना सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.९–४ म्हणून समाविष्ट करण्याची विनंती प्रस्तूत वादी यांनी केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर नि.क्र.१८३ वर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे कथनानुसार प्रस्तूत अर्ज कायद्याने चालण्याजोगा नाही. प्रस्तूत कामातील प्रतिवादी क्र.९ ही मयत झाल्याची तारीख विचारात घेता अर्जासोबत विलंब माफीचा अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे, प्रस्तूत अर्ज मुदतबाह्य असून नामंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

०३. प्रस्तावित प्रतिवादी यांना नोटीसची बजावणी होऊन देखील त्यांनी हजर होऊन आपले म्हणणे सादर केलेले नाही. प्रस्तूत दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, मयत प्रतिवादी क्र.०९ विरुध्दचा

विलंबमाफीचा अर्ज याआधीच नि.क्र.१६३ ते १६५ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.९ चे वारस ९–४ हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**–आदेश –**

०१. निशाणी क्र.१८० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी प्रतिवादी क्र.९–४ यांना दाव्यात समाविष्ट करावे व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी

०३. वादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी नियमाप्रमाणे दावा दुरूस्ती प्रत दाखल करावी.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.08.06 17:47:08 +0530

स्थळ : कणकवली

(टी.एच.शेख)

दिनांक : ०६/०८/२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.